# महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा

<u>सादर</u>

**मा. मुख्यमंत्री**
**मा. उपमुख्यमंत्री**
**मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण)**
**मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण)**
**महाराष्ट्र राज्य**

<u>सादरकर्ते</u>

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**
**नवमहाराष्ट्र युवा अभियान**

**मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१०**

युवा पिढीच्या हाती राष्ट्राचं भवितव्य सुरक्षित आहे असे मी मानतो. कारण, तरुण पिढीला उत्तम सामाजिक जाण असते. उत्साह, प्रामाणिकपणा, तळमळीने काम करण्याची क्षमता त्यांच्यात दिसून येते. त्यांना योग्य संधी मात्र मिळायला हवी.

**– मा. यशवंतराव चव्हाण**

## भूमिका

**म**हाराष्ट्र राज्याचे शिल्पकार श्री यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्यापासून प्रेरणा घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई १९८५ पासून महाराष्ट्रात सक्रिय आहे. समाजाच्या विविध घटकांच्या विकासाला दिशा देण्यासाठी आणि विकासकामांची परिणामकारकता वृद्धिंगत करण्यासाठी प्रतिष्ठान आपल्या विविध विभागांमार्फत कार्य करीत आहे. सरकार आणि समाजाच्या विविध घटकांतील संवाद आणि समन्वयातून ठोस कृतिशीलता घडावी म्हणून प्रतिष्ठान सातत्याने प्रयत्न करीत आहे.

नवमहाराष्ट्र युवा अभियान हा प्रतिष्ठानचा विभाग गेली वीस वर्षे महाराष्ट्रातील युवांबरोबर कार्यरत आहे. त्यातून अनेक उपक्रम आणि योजना उदयास आल्या आणि समाजासाठी झोकून देऊन काम करणारे कार्यकर्तेही पुढे आले आहेत.

युवा विकासासाठी सातत्याने सखोल काम केल्यानंतर संख्येने सर्वाधिक असलेल्या युवांचा विकास व अधिकारांसाठी सरकारने निश्चित स्वरूपाचे धोरण ठरविण्याची निकड पुढे आली. ही तातडीची गरज लक्षात घेऊन नवमहाराष्ट्र युवा अभियानाने काम सुरू केले. अभियानाने वर्षभराहून अधिक काळ महाराष्ट्र राज्य युवा धोरणाबाबत चर्चा घडवून आणली. प्रगतिशील समाज हा राज्य युवा धोरणाचा दृष्टिकोन असला पाहिजे, अशी आमची अपेक्षा आहे. त्यावेळी महाराष्ट्रातील युवांच्या आशा-आकांक्षा व गरजांना या धोरणाने न्याय देणेही अभिप्रेत आहे.

गेल्या वर्षभरापासून शंभर कटिबद्ध कार्यकर्त्यांची एक समिती राज्य युवा धोरणासाठी निरंतर काम करीत आहे. नवमहाराष्ट्र युवा अभियानाने ८ ऑगस्ट २००९ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा मा. मुख्यमंत्री अशोक चव्हाण, मा. उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री मा. सतीश पाटील यांना सादर केला आहे. युवांच्या प्रश्नांवर विविधांगाने कार्य करणाऱ्या राज्यभरातील ३० तज्ज्ञांनी धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांसह मसुदा सादर केला आहे. २२ जिल्ह्यांत कार्यशाळा घेण्यात आल्या. या प्रक्रियेत तीन हजारांवर युवांनी आपली मते व्यक्त केली, लेखी स्वरूपात शिफारशी केल्या. त्याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करण्यात आले. युवा विकास, संशोधन व युवांबरोबर काम करणाऱ्या अनुभवाची शिदोरी पाठीशी असलेल्या दहा जणांच्या कार्यकारी मसुदा समितीने या सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य युवा धोरणाचा सर्वंकष कार्यकारी मसुदा तयार केला आहे.

युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा जाहीर झाल्यानंतर समाजात व्यापक चर्चा आणि विचारमंथन घडून आले आहे. मुद्रित आणि दृकश्राव्य प्रसारमाध्यमांनी समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहचण्यासाठी आम्हाला मोलाचे सहकार्य दिले आणि महत्त्वाची भूमिका बजावली. हे युवा धोरण अधिकाधिक युवा केंद्रित बनविण्यासाठी सर्व समाजघटकांकडून शिफारशी प्राप्त करण्याचे पुढील महत्त्वाचे काम होते. या प्रक्रियेत नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या कटिबद्ध कार्यकर्त्यांनी संपूर्ण राज्यातील १९ विभागांतील

५००० युवांशी प्रत्यक्ष संपर्क साधला. दुर्गम भागातील युवांशी दूरध्वनी, भ्रमणध्वनी, इंटरनेट, टपाल, कुरिअच्या माध्यमातून संपर्क साधण्यात आला. या संपर्कातून आणि नियमित संवादातून वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी असलेल्या युवांनी आपली मते मांडली. या प्रक्रियेत मुले, मुली, विद्यार्थी, बिगर विद्यार्थी, शहरी, ग्रामीण, आदिवासी, दलित, अल्पसंख्यक, अपंग, उभयलिंगी व अन्य उपेक्षित घटकांतील युवांना जाणीवपूर्वक सहभागी करून घेण्यात आले.

ही प्रक्रिया युवांशी प्रत्यक्ष संपर्काच्याही पुढे गेली. अनेक युवा संघटना, स्वयंसेवी संस्था, युवा गटांनी या धोरणाच्या प्राथमिक मसुद्याचा काळजीपूर्वक अभ्यास केला आणि आपले अभिप्राय कळविले. हे अभिप्राय आमच्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. राज्य युवा धोरणासाठी लोकप्रतिनिधींचे पाठबळ आणि सहकार्याची गरज आहे, याची नवमहाराष्ट्र युवा अभियानाला चांगली जाणीव आहे आणि म्हणूनच या दृष्टीने विधानसभा सदस्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. धोरणाच्या प्राथमिक मसुद्याबाबत नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे युवांच्या एका गटाने ११० आमदारांची भेट घेऊन चर्चा केली. सर्वपक्षीय आमदारांनी विशेषत: युवा आमदारांनी या युवा गटाला सकारात्मक प्रतिसाद दिला आणि प्रोत्साहन दिले. युवांनी उपस्थित केलेले प्रश्न व या प्रश्नांवर त्यांनी केलेली चर्चा यातून आम्हाला खूप काही शिकायला मिळाले. राज्य सरकारनेही सचिव पातळीवर चर्चा सुरू करून आणि धोरणाची रचना ठरविण्यासाठी समिती स्थापन करून या दिशेने कृतिशील पावले उचलली आहेत. या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्वांचे, प्रसारमाध्यमे, युवा संघटना, युवा गट, स्वयंसेवी संस्था व लोकप्रतिनिधींचे आभार मानने मी क्रमप्राप्त मानते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील युवांनी दिलेल्या स्वयंस्फूर्त प्रतिसादाबद्दल मी त्यांचेही आभार मानते.

महाराष्ट्र राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा मुख्यमंत्री मा. अशोक चव्हाण, उपमुख्यमंत्री मा. छगन भुजबळ, मा. सुरेश शेट्टी (मंत्री, क्रीडा व युवक कल्याण) व मा. भास्कर जाधव (राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण) यांना सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. राज्य सरकारने युवा धोरण जाहीर करणे, ही फक्त सुरुवात आहे याची आम्हाला जाणीव आहे; युवांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी आणखी बराच लांबचा पल्ला गाठावा लागणार आहे. समविचारी संघटनांच्या सहकार्याने हे धोरण समाजाला नवा दृष्टिकोन देण्यास सहाय्यभूत ठरेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे.



**सुप्रिया सुळे**

निमंत्रक

नवमहाराष्ट्र युवा अभियान

## अनुक्रमणिका


१. प्रास्ताविका

२. धोरणाची तर्काधिष्ठित गरज

३. *युवा*ची व्याख्या

४. मूल्ये

५. युवांचे अधिकार

६. युवांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

७. राज्य आणि समाजाचे दायित्व

८. दृष्टिकोन

९. विशिष्ट ध्येय

१०. उद्दिष्टे

११. प्राध्यान्यक्रम क्षेत्र

१२. युवा व्यक्तिमत्त्वाचे प्राधान्यक्रमकरण

१३. शिक्षण

१४. प्रशिक्षण आणि कौशल्य विकास

१५. उपजीविका

१६. सामाजिक सुरक्षा

१७. आरोग्य व जीवनपद्धती

१८. पर्यावरण

१९. क्रीडा आणि मनोरंजन

२०. कला आणि संस्कृती

२१. विज्ञान आणि तंत्रज्ञान

२२. नागरिकत्व आणि सहभाग

२३. अंमलबजावणी यंत्रणा

२४. युवा धोरणाचे नियमन

२५. संनियंत्रण व मूल्यमापन

२६. आव्हाने

२७. परिनिरीक्षण

२८. परिशिष्टे (अ) - कृती आराखडा, (ब) - अंमलबजावणी संरचना (क) कार्यकारी मसुदा समिती

२९. संदर्भसूची

## १. प्रास्ताविका

१.१ महाराष्ट्र राज्य हे युवांप्रति उत्तरदायी असून राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हे धोरण सादर करण्यात येत आहे. हे धोरण आपला युवांवरील विश्वास, सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठीचे त्यांचे धाडस, स्वत:ला पारखून घेण्याची त्याची इच्छा आणि अशा एका समाजाच्या दिशेने वाटचाल करण्याचा संकल्प की, ज्यात बहुविधता, लोकशाही, कार्यक्षम राजसत्ता, लिंग समभाव आणि सामाजिक न्याय हे त्या समाजाच्या रचनेचा मुख्य आधार असतील, अशा सर्व संकल्पनांवर आधारलेले आहे.[१] मानवी अधिकारांच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आणि युवांच्या सर्वंकष सक्षमीकरणावर भर हा या धोरणाचा मूलाधार आहे.

१.२ हे एक सर्वसमावेशक धोरण असून या धोरणात लिंग, जात, वर्ग, धर्म, भाषा यांच्यातील विविधता समाविष्ट असून भविष्य काळातील आव्हाने ओळखून युवांच्या या प्रवाही आणि क्रियाशील लोकसंख्या समूहाच्या नेमक्या गरजा ओळखून त्यांची दखल घेणे, युवांच्या आकांक्षा आणि त्यांच्या समस्या आदींबाबतचे राज्याचे उत्तरदायित्वाबाबत हे धोरण पुनरुच्चार करते. हे धोरण युवांकरिता काम करण्यापेक्षा युवांसोबत काम करण्याच्या धोरणावर अधिक भर देते.

## २. धोरणाची तर्काधिष्ठित गरज

२.१ एकूण लोकसंख्येच्या ४०.६ टक्के असलेल्या १३ ते ३५ वर्षे वयोगटातील युवांमुळे भारत हा तरुणांचा देश समजला जातो (जनगणना २००१). राष्ट्रीय युवा धोरणाने (२००३) युवा सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित करून त्यांच्यासाठी रचनात्मक शिफारशी केल्या, राज्य या धोरणाचे महत्त्वपूर्ण योगदान मान्य करते. सन २००० पासून भारत सरकारने युवा कल्याणासाठी विविध धोरणांची आखणी आणि अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण (२००२), अकरावी पंचवार्षिक योजना (नियोजन आयोग २००६), शिक्षण धोरण (२००२), राष्ट्रीय किशोरावस्था पुनरुत्पादन व लैंगिक आरोग्य धोरण (२००६) आणि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (२००५-१२) ही काही राष्ट्रीय धोरणे आणि योजनांची उदाहरणे आहेत, ज्यात युवांना विशेषत्वाने समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न करण्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यानेसुद्धा महिला धोरण, औद्योगिक धोरण, क्रीडा धोरण, पर्यटन धोरण, बालविकास धोरण आणि माहिती तंत्रज्ञान धोरण जाहीर केलेले आहे. युवा लोकसंख्येची दखल घेऊन या

[१] राष्ट्रीय युवा धोरणाची समीक्षा (२००४), राष्ट्रीय युवा फाउंडेशन.

धोरणांच्या अंमलबजावणीची युवांशी सांगड घालण्याची आणि युवांच्या प्रश्नांशी या धोरणांचा जाणीवपूर्वक संबंध जोडण्याची आवश्यकता आहे.

२.२ महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे आणि विकसित राज्य आहे. हे राज्य देशातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे असून (सन २००१ च्या जनगणनेनुसार ९.७ कोटी लोकसंख्या आणि देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के प्रमाण) सन २००७ पर्यंत राज्याची लोकसंख्या १०.६ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे (भारताचे महापंजीयक आणि जनगणना कार्यालय, २००६). २००१ मध्ये राज्याचा जननदर हर हजार पुरुषांमागे ९२२ महिला इतका होता. २००१ मध्ये राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ४२.४३ टक्के लोकसंख्या नागरी भागात वास्तव्यास होती, तर ५४.९६ टक्के श्रमशक्ती शेती व्यवसायात होती. सन २००१ मध्ये मानव विकास निर्देशांकात ०.५२३ गुण मिळवून महाराष्ट्र हे राज्य देशात चौथ्या क्रमांकावर होते. मात्र, जिल्हास्तरावर मानव विकास निर्देशांकाचे विश्लेषण केले असता विदर्भ (नागपूर वगळता) मराठवाड्याचा मागासलेपणा प्रकर्षाने अधोरेखित झाला आहे. मुंबई शहर व उपनगरे, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि नागपूर जिल्ह्याने राज्याच्या सरासरी मानव विकास निर्देशांकापेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा १९ टक्के असून सेवा क्षेत्र उत्पादनात १५ टक्के व सकल घरेलू उत्पादनात १३ टक्के इतका वाटा आहे (महाराष्ट्र विकास अहवाल- २००७).

२.३ सन २००१ मध्ये महाराष्ट्रातील युवा पिढीची लोकसंख्या ४१,३४७,८२१ इतकी होती (राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ४२.६८ टक्के). युवा हा काही समरूप गट नसून त्याची स्थळ (नागरी, ग्रामीण, आदिवासी), निवारा (घर असलेले आणि बेघर), आर्थिक गट (उच्च, मध्यम व गरीब), लिंग (महिला, पुरुष व अन्य लैंगिक अधिविन्यास असलेले), भूमिका (विद्यार्थी, बिगर विद्यार्थी, रोजगार असलेले, बेरोजगार, पालक, नागरिक) अशा विभागानुसार त्याची वर्गवारी करता येऊ शकते. या युवांपैकी एक मोठा युवा घटक सामाजिकदृष्ट्या उपेक्षिला गेलेला आहे. जागतिकीकरणाने युवांच्या आशा-आकांक्षा, दृष्टिकोन, कार्य आणि भूमिकांमध्ये लक्षणीय बदल घडवून आणला आहे. ज्यांचा युवांच्या अस्वस्थतेवर कायम दबाव राहिला आहे.

२.४ महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस सुवर्ण महोत्सवी वर्षात स्वतंत्र युवा धोरणाची गरज विशेषत्वाने पुढील कारणांसाठी जाणवते :

२.४.१ युवा अवस्था ही जीवनातील अत्यंत महत्त्वाची अवस्था आहे. या अवस्थेत सळसळता उत्साह, आदर्शवाद, उच्च ऊर्जा याबरोबरच अस्थिरता, गोंधळ आणि आव्हाने अशी स्थिती असते.

सामाजिक व्यवस्थेने घालून दिलेल्या मापदंडानुसार कुटुंब, शाळा/महाविद्यालयांसारख्या अन्य संस्था युवांना त्यांच्या जीवनाशी संबंधित घटकांच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्यास नेहमीच डावलत असतात.

२.४.२ राज्याने शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सामाजिक न्याय यांसारखी धोरणे ठरविताना युवांवर अप्रत्यक्षपणे लक्ष केंद्रित केले असले, तरी ते करीत असताना युवावस्था हा आधार गृहीत धरलेला नाही.

२.४.३ युवांमध्ये असलेल्या उपजत रचनात्मक ऊर्जेचा समाजाने कधीही पूर्णत: वापर करून घेतलेला नाही आणि युवांनाही त्याची अंगभूत क्षमता ओळखता आलेली नाही. त्यामुळे युवांबरोबरच समाजावरही त्याचा विपरित परिणाम झाला आहे. राज्याची धोरणे निश्चित करीत असताना एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४३ टक्के असलेल्या युवांचा त्यात समावेश केला, तर राज्यासाठी ते मोठे भांडवल ठरणार आहे.

२.४.४ युवा हा प्राधान्यक्रम लक्षात घेऊन युवांशी संबंधित सर्व मुद्द्यांचा समग्र विचार करून विविधांगी रणनीतीद्वारे युवांचे सक्षमीकरण घडवून आणण्याचा कृतिकार्यक्रम अनिवार्य बनला आहे.

## ३. युवांची व्याख्या

३.१ युवा ही जीवनातील एक अवस्था आहे, असे हे धोरण मानते. युवा अवस्थेच्या या स्थितीमध्ये युवांमध्ये केवळ शारीरिक आणि मानसिक बदल होतात असे नाही, तर कुटुंब आणि सामाजिक जीवनातील त्याच्या भूमिकांमध्येही बदल घडून येतात. समाजातील भौगोलिक, लैंगिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेमुळे निश्चित अशा वयोमर्यादेवर आधारित *युवा*ची सर्वसामान्य व्याख्या करणे खूप गुंतागुंतीचे बनते.

३.२ भारताच्या युवा धोरणाला (२००३) अनुसरून हे महाराष्ट्र युवा धोरण *१३ ते ३५ वर्षे वयोगटातील सर्व मनुष्य म्हणजे युवा* अशी युवांची व्याख्या करते.

३.३ राष्ट्रीय युवा धोरण २००३ मध्ये म्हटल्याप्रमाणे हे धोरण युवांसाठी १३ ते ३५ वर्षे वयोगट व्यापक असल्याने या गटाची दोन उपगटात विभागणी करणे आवश्यक मानते. ती पुढीलप्रमाणे :

अ) किशोरावस्था (वय- १३ ते १९ वर्षे)

ब) युवा वयस्क (वय- २० ते ३५ वर्षे)

३.४ २० ते ३० वयोगटातील युवांना अधिक प्राधान्य दिले पाहिजे, असे हे धोरण नमूद करू इच्छिते. ३० ते ३५ वर्षे वयोगटातील युवा वयस्कांची मोठी संख्या जी कठीण परिस्थितीतून जात आहे, वंचित राहिलेली आहे, ज्यांना संधी मिळालेली नाही आणि योजना अथवा कार्यक्रमांचा लाभ झालेला नाही, अशा युवांना *युवा* या व्याख्येत समाविष्ट करून घ्यावे. ३० ते ३५ वर्षे वयोगटातील युवा वयस्कांच्या अंतर्भावाबाबत विस्तृत चर्चा करून वेळोवेळी आढावा घेण्यात यावा, असे हे धोरण सुचविते.

## ४. मूल्ये

भारतीय राज्यघटनेने निश्चित केलेल्या मूल्यांना हे धोरण प्रमाण मानते. युवांचे सक्षमीकरण हे या धोरणाचे मुख्य ध्येय असून खालील मुख्य मूल्यांवरते आधारित आहे.

४.१ **लिंगसमभाव :** लिंग, यौन क्रिया आणि लैंगिक अभिविन्यास याबाबत भेद न करता दर्जा व संधी.

४.२ **युवा सहभाग :** युवांचा त्यांच्याशी आणि समाजाशी संबंधित सर्व प्रकारच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार.

४.३ **समग्रता :** सर्व युवांना समान संधी, सर्वांना सन्मानाने जगण्याचा अधिकार; शारीरिक, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या वंचित समूहांच्या अधिकारांवर विशेष भर.

४.४ **विविधतेचा आदर :** सांस्कृतिक, आध्यात्मिक, भाषिक आणि धार्मिक विविधतेचा आदर हा विकासाचा आधारभूत सिद्धांत.

४.५ **शाश्वतता :** विद्यमान पिढीच्या गरजांची पूर्तता करीत असताना भावी पिढीच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेचा ऱ्हास होऊ न देता निसर्गाशी सामंजस्यपूर्ण सहअस्तित्व.

४.६ **उत्तरदायित्व :** युवांची समाजाप्रति आणि समाजाची युवांप्रति जबाबदारी आणि उत्तरदायित्व.

## ५. युवांचे हक्क

हे धोरण मानवी हक्कांवर आधारलेले आहे. त्या अनुषंगाने खालील हक्कांची ते प्रचिती देते :

५.१ देशाच्या नागरिकत्वाचा हक्क आणि भारतीय राज्यघटनेत नमूद केलेल्या मूलभूत हक्कांची हमी.

५.२ स्वत:च्या आणि समाजाच्या विकासाशी संबंधित योजना आणि कार्यक्रमांच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क.

५.३ दर्जेदार शिक्षण, समान संधी आणि निकोप पर्यावरणाचा हक्क.

५.४ सन्मानाने आणि उत्पादक क्षमतेने जगण्यासाठी उपजीविकेचा हक्क.

५.५ लोकशाही मार्गाने स्वायत्त विद्यार्थी आणि बिगर विद्यार्थी संघटना आणि प्रशासकीय यंत्रणामध्ये संघटना बांधण्याचा आणि त्यात सहभागी होण्याचा हक्क.

५.६ स्वच्छ पर्यावरण आणि आरोग्यदायी जीवन जगण्याचा हक्क.

५.७ लैंगिक आणि पुनरुत्पादन जीवनात निवडीचा हक्क.

५.८ सर्व प्रकारचे शोषण, हिंसा, अत्याचार आणि विषमतेपासून संरक्षणाचा हक्क.

## ६. युवांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

समाजाच्या विकासात युवा महत्त्वाची भूमिका बजावतात, असे हे धोरण मानते. त्यामुळे युवांचे अधिकारांव्यतिरिक्त त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत :

६.१ शांतता, सुरक्षितता आणि विकासाला प्रोत्साहन देणे.

६.२ मानवी सन्मान आणि सर्वांप्रति आदर वृद्धिंगत करणे.

६.३ सर्व प्रकारच्या हिंसा, शोषण, गुन्हेगारी, भेदाभेद यांपासून मुक्त समाजाच्या उभारणीत योगदान देणे.

६.४ विविध संस्कृती, भाषा, धर्म आणि राजकीय विचारसरणीचा सन्मान आणि आदर करणे.

६.५ राष्ट्रीय व राज्य सेवा, सामाजिक कार्य आणि स्वयंसेवी प्रयत्नांतून विकासाच्या प्रक्रियेत रचनात्मक योगदान देणे.

६.६ सार्वजनिक मालमत्ता आणि इतरांच्या मालमत्तेचा सन्मान करणे.

६.७ परिस्थितीकीय समतोलाबाबत संवेदनशील बनून परिस्थितीकीय संरक्षण आणि जतन करणे.

६.८ जबाबदार नागरिक बनणे.

## ७. राज्य व समाजाचे दायित्व

७.१ हे धोरण युवांच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक कल्याणासाठी पाठबळ देण्याकरिता राज्य आणि समाजाचे दायित्व अधोरेखित करते. समाजातील वयस्कांनी सर्वांसाठी सकारात्मक आदर्शाप्रमाणे कृती करावी आणि समाज जीवनातील युवांच्या सहभागाकरिता त्यांनी प्रोत्साहन द्यावे, अशी या धोरणाची

अपेक्षा आहे. हे धोरण अशीही अपेक्षा करते की, युवांच्या क्षमता पूर्णपणे उपयोगात आणण्यासाठी आणि त्यांच्या ध्येयपूर्तीसाठीच समाजाने केवळ सहकार्य न करता, त्यांच्याकडे उद्याचे नेतृत्व म्हणून पाहण्यापेक्षा आजच्या विकास प्रक्रियेतील समान भागीदार म्हणून पहावे.

## ८. दृष्टिकोन

८.१ हे युवा धोरण अशा समाजाची कल्पना करते की, ज्यात युवा हे स्वावलंबी, सक्षम, समानता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्याशी बांधीलकी मानणारे आणि राज्य व समाजाच्या सर्वंकष तसेच स्वयंपूर्व विकासासाठी झोकून दिलेले असतील.

## ९. विशिष्ट ध्येय

९.१ युवांचे ध्येय, त्यांच्या क्षमता आणि कर्तव्य यांसाठी पोषक वातावरण निर्माण करून समानता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्याशी बांधीलकी ठेवून युवांचे त्यांच्या स्वत:च्या व समाजाच्या विकासात एक उपयुक्त आरोग्यसंपन्न आणि जबाबदार नागरिक म्हणून योगदान वाढविणे.

## १०. उद्दिष्टे

१०.१ धर्म, पंथ, जात, वर्ग, लिंग, भौगोलिक स्थान आणि क्षमतेचा स्तर याची पर्वा न करता सर्व युवांना हक्क आणि अधिकार प्राप्त करून देणे.

१०.२ युवांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य, जीवनमान, निवारा आणि करमणूक सुविधांची हमी देणे.

१०.३ युवांची निर्णयक्षमता, लोकशाहीतील सहभाग, तर्कसंगत विचार आणि नेतृत्व गुणांचा विकास करणे.

१०.४ युवांच्या आशा, आकांक्षा, गरजा आणि समस्या यांची जाणीव करून देण्यासाठी संधी निर्माण करणे.

१०.५ युवांमधील कमकुवतपणा घटवून युवांना संधी निर्माण करून देणारी सहायक यंत्रणा उभी करणे.

१०.६ सरकार आणि नागरी संस्थांच्या सर्व विकास कार्यक्रमांच्या नियोजन, निर्णय प्रक्रिया आणि अंमलबजावणीमध्ये युवांचा स्वयंस्फूर्त सहभाग वाढवून राष्ट्राच्या आणि राज्याच्या विकासाला चालना व प्रोत्साहन देणे.

१०.७ युवांशी संबंधित सर्व मुद्दयांना संबोधित करण्यासाठी एकात्मिक आणि बहुस्तरीय समन्वय, सहायकारी व्यवस्था व प्रतिसाद यंत्रणा विकसित करणे.

## ११. प्राधान्यक्रम क्षेत्र

युवा सक्षमीकरण ही युवा जीवनाच्या विविध पैलूंशी संबंधित बहुआयामी प्रक्रिया आहे. त्यामुळे हे धोरण युवांशी संबंधित पुढील मुख्य घटकांना प्राधान्यक्रम देते :

- शिक्षण
- प्रशिक्षण व कौशल्य विकास
- उपजीविका
- सामाजिक सुरक्षा
- आरोग्य व जीवनशैली
- पर्यावरण
- क्रीडा आणि मनोरंजन
- कला व संस्कृती
- विज्ञान व तंत्रज्ञान
- नागरिकत्व आणि सहभाग

## १२. युवा गटांचा प्राधान्यक्रम (विशेष गट/प्राधान्य गट/कमकुवत गट)

हे धोरण खालील युवांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची शिफारस करते.

- युवती
- दुर्गम भागातील आदिवासी युवा
- अल्पसंख्यक लोकसमूहातील युवा
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती आणि भटके आदिवासी युवा
- नागरी गलिच्छ वस्त्या, बेघर आणि रस्त्यावरील भटके युवा
- औपचारिक शिक्षणातून गळती झालेले युवा

- अपंग युवा
- सामाजिकदृष्ट्या लांच्छित युवा (जसे- समलिंगी, द्वैलिंगी, उभयलिंगी, व्यावसायिक वेश्या, गुन्हेगार इत्यादी)
- अतिशय जटिल परिस्थितीचा सामना करणारे युवा (जसे- मानवी तस्करीचे बळी, गुन्हेगारांची पाल्ये, कायद्याच्या कचाट्यात सापडलेले किशोरवयीन आणि वयस्क युवा, दहशतवादग्रस्त भागातील युवा, मानवी व नैसर्गिक आपत्तींमुळे विस्थापित झालेले युवा)

## १३. शिक्षण

मुले व युवांचे जीवन आणि उपजीविका समृद्ध करण्यासाठी अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या कुटुंब व्यवस्थेनंतर औपचारिक शिक्षण व्यवस्था हा महत्त्वाचा सामाजिकरण घडवून आणणारा घटक आहे. एकंदर भारताचा विचार केल्यास महाराष्ट्रातील शिक्षणाचा स्तर तुलनेने वरचढ आहे आणि पटनोंदणीतील लिंग विषमभाव अगदीच नगण्य आहे. साक्षरतेच्या बाबतीत देशात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागत असला तरी, हंगामी स्थलांतरित मुले आणि युवांचे अनेक गट औपचारिक शिक्षण व्यवस्थेपासून वंचित आहेत. प्राथमिक शिक्षणासाठी पटनोंदणीचे प्रमाण सार्वत्रिक चांगले असले, तरी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावरील गळतीचे प्रमाणही मोठे आहे. या धोरणाच्या १२ व्या विभागात नमूद करण्यात आलेले युवांचे विविध सामाजिक समूह अजूनही उच्च शिक्षणाच्या कक्षेबाहेर आहेत. शिक्षणाच्या माध्यम भाषेमुळे दर्जाची विभागणी झाल्याचेही आढळून येते. हे धोरण शिक्षणाची उपलब्धता आणि गुणवत्तेबाबत मार्गदर्शक सूचना करते.

### धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

१३.१ राज्याने ० ते १८ वर्षे वयोगटातील सर्वांना मोफत, अनिवार्य आणि दर्जेदार शिक्षणाच्या हक्काची हमी द्यावी.

१३.२ राज्याने शिक्षणाच्या माध्यमातून संविधानिक मूल्यांचे धडे द्यावेत. त्यासाठी आवश्यकता भासल्यास अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी.

१३.३ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावरील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

१३.४ राज्याने सर्वांना शिक्षणाच्या समान संधीची हमी द्यावी. त्याचबरोबर समाजातील वंचित, उपेक्षित घटकांना शिष्यवृत्ती, विनाशुल्क शिक्षण आणि वसतिगृह सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर द्यावा. ठोक मूल्य निर्देशांकाच्या आधारावर शिष्यवृत्तीचा वेळोवेळी आढावा घ्यावा.

१३.५ राज्याने अपंग आणि दुर्बल युवांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची हमी द्यावी.

१३.६ युवांमध्ये व्यापक व सर्वंकष कौशल्य विकसित करण्यासाठी राज्याने युवांना विविध विद्याशाखांतील अभ्यासविषय उपलब्ध करून द्यावेत. त्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

१३.७ औपचारिक शिक्षण व्यवस्थेतील प्रवेशाचा भाग म्हणून राज्याने गळती झालेल्या आणि शाळाबाह्य राहिलेल्यांसाठी अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमाची तरतूद करण्याची हमी द्यावी.

१३.८ राज्याने शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद किंवा तत्सम संस्थांमार्फत अभ्यासक्रमाचे नियमित पुनरावलोकन करून ते अद्ययावत करावेत. युवांच्या समकालीन गरजा, मूल्यांना प्रोत्साहन आणि कालानुरूप लवचिकतेवर आधारित अभ्यासक्रम अद्यायावत करण्यात यावेत.

१३.९ राज्याने शैक्षणिक अभ्यासक्रम हे वैज्ञानिक दृष्टिकोन, अनुभवाधारित आकलन, पर्यावरणाबाबत जागरूकता, व्यावसायिक शिक्षणावर भर आणि स्वदेशी ज्ञानाचा आदर यांना प्रोत्साहन देणारे असतील, याची दक्षता घ्यावी.

१३.१० राज्याने शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणासह जीवन कौशल्याच्या शिक्षणाचा अंतर्भाव करावा.

१३.११ राज्यातील विविध शैक्षणिक व्यवस्था आणि मानकांना समान दर्जा द्यावा. सर्व शैक्षणिक संस्थांतील अध्यापन-अध्ययनाची प्रक्रिया बळकट करण्यासाठी राज्याने पायाभूत सुविधा (वर्ग, खोल्या, फर्निचर), शैक्षणिक सुविधा (ग्रंथालय, प्रयोगशाळा) आणि विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षकांची उपलब्धता आदी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची हमी द्यावी.

१३.१२ राज्याने पात्रताधारक अध्यापकाची उपलब्धता आणि आवश्यक प्रशिक्षणाद्वारे प्रभावी अध्यापनाची उपलब्धता करून देण्याची हमी द्यावी. त्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यावी आणि युवा केंद्रित अध्यापन पद्धतीद्वारे सर्वंकष व्यापक शिक्षणाची हमी द्यावी.

१३.१३ खाजगी क्षेत्रातील शिकवणी वर्गांचे संनियंत्रण करण्यासाठी राज्याने मानके आणि नियामक यंत्रणा स्थापित करावी.

१३.१४ राज्याने प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये लैंगिक अत्याचार विरोधी समिती आणि अनुसूचित जाती, जमाती कक्ष स्थापन करणे बंधनकारक असेल, अशी कायदेशीर तरतूद करावी.

१३.१५ राज्याने वंचित व उपेक्षित गटांना कोणतेही बंधपत्र अथवा हमीपत्राशिवाय नाममात्र व्याजदराने कर्ज आणि अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी.

१३.१६ राज्याने आणि विद्यापीठांनी युवांना मराठी भाषेतून उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी. त्यासाठी मराठीतून संदर्भ आणि अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी.

१३.१७ राज्याने शालेय अभ्यासक्रमात शेती, व्यवस्थापन, संवाद कौशल्य, विधी साक्षरता, नागरिकत्व आणि समाजसेवा यांसारखे नवे विषय प्रायोगिक तत्त्वावर अंतभूर्त करण्याबाबत विचार करावा.

१३.१८ राज्याने युवांना स्वयंसेवी कार्य आणि समाजसेवेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणारी यंत्रणा उभी करावी आणि शिक्षण व्यवस्थेत तशा आशयाची जाणीवपूर्वक तरतूद करावी.

१३.१९ विशिष्ट युवा गटांसाठी स्थापन करण्यात आलेल्या शासकीय समित्यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणीची राज्याने हमी द्यावी.

१३.२० राज्याने प्रत्येक शैक्षणिक संस्थेत वैयक्तिक समुपदेशन, रोजगार-स्वयंरोजगार मार्गदर्शन, प्रशासकीय सहायता केंद्राची स्थापना करावी.

१३.२१ राज्याने युवांना शासकीय, निमशासकीय आणि खाजगी क्षेत्रातील स्पर्धा परीक्षा मराठीतून देण्याची संधी उपलब्ध करून देण्याची हमी द्यावी.

१३.२२ हे शिक्षण उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी निरंतर शिक्षण, दूरस्थ शिक्षण आणि मुक्त शिक्षणाची गरज अधोरेखित करते आणि दूरस्थ व मुक्त शिक्षण देणाऱ्या विद्यापीठे/संस्थांना विशेष प्राधान्याने राज्याने प्रोत्साहन द्यावे, अशी शिफारस करते.

१३.२३ विज्ञानाचे शिक्षण आनंददायी होण्यासाठी आणि वैज्ञानिक जाणिवा व दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राज्याने औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक अभ्यासक्रमाचे पुनर्विलोकन करावे आणि त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्याच्या सूचना द्याव्यात.

## १४. प्रशिक्षण आणि कौशल्य विकास

सद्य:स्थितीत औपचारिक शिक्षण व्यवस्था ही मुख्यत्वे ज्ञानाधारित (सैद्धांतिक कौशल्य/पुस्तकी ज्ञान) असून या शिक्षण व्यवस्थेत व्यावसायिक दृष्टिकोनाचा विकास आणि नवीन कौशल्य (मनोशारीरिक/विशेष) आत्मसात करण्याची क्षमता विकसित करण्याला खूपच कमी संधी आहे. औपचारिक शिक्षणाचा आणि रोजगार-स्वयंरोजगार व उपजीविकेची संभाव्य साधने यांचा काहीएक संबंध नसल्याचे निदर्शनास आले आहे. जागतिकीकरणाच्या या युगात दर्जेदार मानव विकासासाठी व्यवस्थापन कौशल्य, बहुस्पर्शीत्व, बहुशाखीय कौशल्य, आंतरविद्याशाखीय कौशल्य,

व्यक्तिमत्त्व विकास कौशल्य ही सार्वत्रिक अनिवार्य व्यावसायिक कौशल्य ठरली आहेत. त्यामुळे युवांचे प्रशिक्षण आणि कौशल्य विकास सक्षम करणे अत्यावश्यक बनले आहे.

**धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

१४.१. सर्व प्रकारच्या व्यवसाय व काम करणाऱ्या, औपचारिक शिक्षण घेतलेल्या युवांना कौशल्य विकासाचे निरंतर प्रशिक्षण देणारी यंत्रणा राज्याने उभी करावी.

१४.२. भारत सरकारच्या राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि प्रस्तावित राष्ट्रीय कौशल्य विकास संस्थेशी संलग्न असणारी महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था राज्याने स्थापन करावी.

१४.३. राज्याच्या विकासाचा विद्यमान टप्पा लक्षात घेऊन राज्याने प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमात मूलभूत व कालानुरूप कौशल्य विकास प्रशिक्षणाचा अंतर्भाव असेल, याची हमी द्यावी. जे तांत्रिक, बिगर तांत्रिक, व्यवस्थापन, बिगर व्यवस्थापन आणि स्वयंउद्योजकता क्षेत्रात फायदेशीर ठरेल.

१४.४. युवांना उद्योजकता व बाजाराधिष्ठित कौशल्य क्षमता प्रदान करण्यावर विशेष भर देण्यासाठी राज्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमआयडीसी) आणि जिल्हा उद्योग केंद्राची (डीआयसी) पुनर्रचना करण्याबाबत विचार करावा. उपजीविकेच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्याने या संस्थांच्या प्रस्तावित पुनर्रचनेत गरजांवर आधारित अभ्यासक्रमांच्या विकासासह सामाजिक व खाजगी क्षेत्रासह सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या शक्यता पडताळून पहाव्यात.

१४.५. उपरोक्त भाग ११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्राधान्यक्रम क्षेत्रातील प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी राज्याने युवांना योग्य भत्ता द्यावा.

१४.६. साक्षर, अर्धसाक्षर, विकलांग, वंचित युवांना उपयोगी ठरतील. तसेच त्यांना समाविष्ट करून घेतील, असे कौशल्य व उद्योजकता विकास पाठ्यक्रम राज्याने सुरू करण्याची हमी द्यावी.

१४.७. राज्याने असे प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रमांचे अभ्यासक्रम व प्रतिमान विकसित करावेत, की ते अशा विशेष उद्दिष्टांच्या अध्ययनावर आधारित असतील, ज्या स्वयंजागृती, संवाद कौशल्य, वाटाघाटींचे कौशल्य, संघ भावना, भावनात्मक चातुर्य, दर्जेदार मानकांचा वापर करून रणनीतीचे नियोजन व मूल्यांचा अंतर्भाव असेल.

१४.८. स्थानिक गरजा कालानुरूप लक्षात घेऊन त्यांचा अंतर्भाव करण्यासाठी प्रशिक्षण व कौशल्य विकास प्रक्रिया निरंतर व विकेंद्रित असावी.

१४.९. राज्याने कौशल्य विकास पाठ्यक्रम घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन व समर्थन द्यावे.

१४.१०. प्रशिक्षण आणि/किंवा कौशल्य विकास पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या युवांना बँका आणि अन्य वित्तीय संस्थांनी मान्यता द्यावी आणि स्वत:चा उद्योग अथवा युवा स्वयंरोजगार गट स्थापन करण्यास मदत करावी. त्यांना सूक्ष्म वित्तीय व सूक्ष्म पत धोरणाला प्रोत्साहन देत माफक व वाजवी व्याजदराने पत पुरवठा करावा.

१४.११. रोजगार देऊ इच्छिणाऱ्या आणि प्रशिक्षित उमेदवारांच्या शोधात असलेल्यांच्या उपयोगासाठी राज्याने प्रशिक्षित युवांची तपशीलवार माहिती/गोषवारा राज्य व जिल्हा स्तरावर एकत्रित करावा. त्याची देखभाल, नियमित अद्ययावत करणे आणि त्याचा प्रचार-प्रसार करावा.

१४.१२. महिला युवांच्या कौशल्य विकासासाठी राज्याने व्यापक प्रमाणात महिला युवांना कौशल्य प्रशिक्षण द्यावे.

## १५. उपजीविका

राज्याचे कर्तव्य फक्त युवांसाठी रोजगार आणि उपजीविकेच्या संधीसाठी पोषक वातावरण निर्माण करणे, एवढेच नसून त्या संधींचा उपयोग व लाभ करून घेण्याची क्षमता विकसित करणे हे सुद्धा आहे. सामाजिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील १८ वर्षांखालील कोणत्याही मुलाला काम करणे भाग पडणार नाही, याची राज्याने हमी द्यावी. युवांची वंचितावस्था कमी करण्यासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी राज्याने सातत्याने कौशल्य सुधारणा करावी. त्यांना वित्तीय/पतपुरवठा करावा. त्यासाठी सर्वांसाठी समान धोरणाचा अवलंब करावा.

**धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

१५.१. राज्याने *पंचवार्षिक महाराष्ट्र राज्य युवा उपजीविका कृती आराखडा* तयार करावा. दर पाच वर्षांनी त्याच्या अंमलबजावणीचा प्रभाव आणि परिणामकारकता याचा आढावा घ्यावा. या प्रस्तावित कृतिआराखड्यासाठी राज्याने विशेष कृती दलाची स्थापना करावी. या कृती आराखड्यात सामाजिक व खाजगी क्षेत्राच्या सहभागाच्या शक्यता पडताळून पहाव्यात.

१५.२. युवांना एक खिडकी योजनेद्वारे रोजगार आणि/किंवा स्वयंरोजगाराच्या योजनांची माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी, यासाठी राज्याने सद्य:स्थितीतील रोजगार मार्गदर्शन केंद्र योजनेचा आढावा घेण्याबाबत विचार करावा. युवांना जास्तीतजास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेत रोजगार संधींची अद्यायावत माहिती नियमितपणे देण्यात यावी.

१५.३. युवांना उपजीविकेच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्याने गावपातळीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रोजगार निर्मितीच्या शक्यता पडताळून पाहाव्यात.

१५.४. बेरोजगारीमुळे होणारे सक्तीचे स्थलांतर रोखण्यासाठी युवांना स्थानिक पातळीवर उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्याने विशेष प्रयत्न करावेत.

१५.५. युवांना किमान वेतन कायद्यान्वये वेतन/मोबदला/मजुरी मिळेल अशी तरतूद राज्याने करावी, त्यासाठी राज्याने भारत सरकारने केलेल्या शिफारशीनुसार मजुरीच्या दराचा आढावा घ्यावा आणि घाऊक मूल्य निर्देशांक व जगण्याच्या खर्चाचा निर्देशांकावर आधारित त्याचा ठरावीक काळानंतर वेळोवेळी आढावा घ्यावा.

१५.६. राज्याने मानवशक्तीच्या गरजा आणि मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी कृती दल स्थापन करण्याबाबत विचार करावा. हे कृती दल सद्य:स्थितीतील शिक्षणातून विकसित होणारे कौशल्य आणि कृषी, उत्पादन व सेवा क्षेत्र यांसारख्या क्षेत्रांसाठी प्रत्यक्षात आवश्यक असलेली कौशल्य या दरम्यानची पोकळी निश्चित करेल आणि ती भरून काढण्यासाठीच्या उपाययोजना सुचवेल.

१५.७. राज्याने प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर कमवा आणि शिका योजनेला प्रोत्साहन द्यावे आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अर्धवेळ काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या युवांना प्रोत्साहित करावे, त्यासाठी आवश्यकता भासल्यास पाठ्यक्रमाची पुनर्रचना करावी.

१५.८. राज्याने असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या युवांसह हंगामी, अकुशल आणि कमी वेतनाचा रोजगार करणाऱ्या युवांसाठी रोजगार संधींचे सातत्याने नियमन करावे.

१५.९. राज्याने विविध क्षेत्रात विविध काम करणाऱ्या युवांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांना गती द्यावी.

१५.१०. राज्याने तालुका पातळीवर रोजगार मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रे स्थापन करावीत. ही केंद्रे विविध योजना आणि कार्यक्रमांच्या माहितीसाठी सर्व मंत्रालये, विभाग व खाजगी क्षेत्राशी जोडलेली असावीत. स्वयंसेवी संस्थांना अशी केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन व समर्थन देण्यात यावे.

१५.११. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रावरील संकट लक्षात घेऊन राज्याने युवांसाठी रोजगाराच्या संधी म्हणून कृषी आणि कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. अन्न प्रक्रिया व वेष्टन बांधणी, साठवण व्यवस्था, दळणवळण आणि कृषी-पर्यावरण पर्यटन आदी कृषी आधारित उद्योगांचा त्यात अंतर्भाव असावा.

१५.१२. प्रगतिशील युवा शेतकऱ्यांना प्रोत्साहन आणि मदत करण्यासाठी राज्याने विभागीय पातळीवर कृषी संशोधन केंद्रे स्थापन करावीत. या केंद्रांना कृषीआर्थिक व्यवहार क्रिया, सेंद्रीय/नैसर्गिक शेती आणि शास्त्रशुद्ध शेतीवर विशेष लक्ष केंद्रित करावे.

१५.१३. राज्याने कोरडवाहू शेती करणाऱ्या युवा शेतकऱ्यांना वित्तीय आणि/किंवा तत्सम प्रोत्साहने द्यावीत आणि शेती हे उपजीविकेचे उत्पादक व फलदायी साधन आहे, याची खात्री द्यावी.

१५.१४. राज्याने कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेत युवा महिला करीत असलेल्या घरकामाला उत्पादक योगदान म्हणून मान्यता आणि प्रतिष्ठा द्यावी. हे धोरण कुटुंब अर्थव्यवस्थेतील महिलांच्या उत्पादक योगदानाचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याची शिफारस करते. या समितीने महिलांच्या सत्ता व संपत्तीच्या वाटपातील समान अधिकारांबाबतही अभ्यास करावा.

१५.१५. हे धोरण महाराष्ट्राचा ग्रामीण रोजगार हमी कायदा अमलात आणण्यासाठीचा पुढाकार आणि उल्लेखनीय भूमिका लक्षात घेऊन अशी शिफारस करते की, नागरी व्यवस्थेत अशी रोजगार हमी योजना अमलात आणता येईल काय, याची शक्यता पडताळून पाहण्यात यावी.

१५.१६. राज्याने स्वयंरोजगार करणाऱ्या युवांसाठी व्यावसायिक क्षेत्रात नगर रचना करताना जागा राखून ठेवावी.

१५.१७. राज्याने सहकार चळवळीला प्रोत्साहन देऊन बळकटी द्यावी. युवा स्वयंसहायता गटांच्या वस्तू व सेवांच्या उत्पादन आणि विपणन प्रक्रियेमधील सहभाग वाढवावा. त्यासाठी खाजगी क्षेत्र आणि सरकारी क्षेत्रांनी समन्वय साधावा.

१५.१८. राज्याने वन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. उपजीविकेसाठी वनांवर अवलंबून असलेल्या आदिवासी युवांना वनांचा वापर व वन उत्पादनांची मालकी प्रदान करावी.

१५.१९. राज्याने युवा स्वयंसहायता गटांना सरकारी मालकीच्या जमिनी समूह शेतीसाठी उपलब्ध करून देण्याच्या शक्यतेची व्यवहार्यता पडताळून पहावी.

## १६. सामाजिक सुरक्षा

युवांसाठी सामाजिक सुरक्षेची तरतूद मानवाच्या जगण्याच्या आणि उपजीविकेच्या अधिकारावर आधारलेली आहे. असे असले तरी समाजातील उपेक्षित घटक विशेषत: युवांना संधीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्यामुळे केवळ या सामाजिक व संरचनात्मक त्रुटी दूर करणे एवढेच राज्याचे कर्तव्य नाही, तर त्यांच्यासाठी सुरक्षा कवच निर्माण करण्याचेही कर्तव्य आहे. मार्गदर्शन, दिशा व संधीचा अभाव आणि समाजाने दखल न घेतल्यामुळे युवांमध्ये वैफल्य येत असल्याचे अनेक अभ्यास व संशोधनातून लक्ष वेधण्यात आले आहे. युवांना अनेक समूहांना संधी नाकारल्याने दुष्परिणाम टाळण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक बनले आहे.

**धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

१६.१ राज्याने युवांच्या स्थलांतराचे प्रारूप (राज्यात येणारे, राज्यातून बाहेर जाणारे आणि राज्यांतर्गत) नियमितपणे अभ्यासावे आणि राज्यांतर्गत युवांच्या स्थलांतराचे प्रारूप लक्षात घेऊन धोरणे आखावीत.

१६.२ भारत सरकारच्या प्रस्तावित सामाजिक सुरक्षा विधेयकानुसार, ९२ टक्के श्रमशक्ती असंघटित क्षेत्रात काम करते. या क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी हे धोरण खालील शिफारशी करते :

६.२.१ असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या युवा कामगारांना भविष्य निर्वाह निधी, प्रसुति रजा, अपघात नुकसान भरपाई इत्यादी सुविधा उपलब्ध करून त्यांना कामगार कल्याण कायद्यासारख्या कायद्याच्या कक्षेत आणून सामाजिक संरक्षण द्यावे.

६.२.२ असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना काम देणाऱ्या नियोक्त्याने/संघटनेने/संस्थेने कामाच्या ठिकाणाबरोबरच काम मागितलेल्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी राज्याने हमी द्यावी.

१६.३ राज्याने युवांना खाजगी व सार्वजनिक ठिकाणी आणि कामाच्या ठिकाणी होणाऱ्या शारीरिक, भावनिक व लैंगिक शोषणासह अन्य प्रकारच्या शोषणापासून संरक्षण द्यावे.

१६.४ राज्याने नियोक्त्याद्वारे कामाच्या ठिकाणी कामाच्या सुरक्षिततेची शास्त्रीय तत्त्वे आणि उच्च दर्जा राखला आहे याचे निरीक्षण करावे.

१६.५ युवांना ताजेतवाने ठेवण्यासाठी राज्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार पुरेसा मोकळा वेळ, साप्ताहिक सुटी, कामाचे निर्धारित तास, सुट्या देण्यात येतील, याची राज्याने हमी द्यावी.

१६.६ हंगामी निवास व्यवस्थेचा अभाव लक्षात घेऊन राज्याने विद्यार्थी, काम करणारे आणि स्थलांतरित युवांसाठी गरजांवर आधारित प्रभावी व व्यावसायिक दृष्टीने व्यवस्थापन असलेली वसतिगृहे स्थापन करावीत.

१६.७ बदलत्या सामाजिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत पारंपरिक व्यवसायांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे राज्याने या व्यवसायांचे संरक्षण व पुनरुज्जीवन करण्यासाठी विशिष्ट सहायक व्यवस्था आणि सक्षमीकरण यंत्रणा विकसित करावी.

१६.८ राज्याने कोणत्याही राज्याच्या धोरणांमुळे किंवा नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींमुळे प्रभावित झालेल्या व स्थलांतरित झालेल्या युवांना सामाजिक सुरक्षा वेळेवर व तातडीने पुनर्वसन त्याचबरोबर शिक्षण, निवारा, उपजीविकेची साधने उपलब्ध करून देण्याची हमी द्यावी.

१६.९ राज्याने कायद्याच्या कचाट्यात सापडलेले युवा, पहिल्यांदाच गुन्हा करणारे आणि युवा गुन्हेगार, बेघर/रस्त्यावरील युवा, निराधार युवा, व्यावसायिक वेश्यावृत्ती करण्यांची पाल्ये, मानवी तस्करीने पीडित व दुष्काळग्रस्त भाग, अतिशय दुर्गम आदिवासी भाग व दहशतवादग्रस्त भागातील युवांसाठी सुधारणात्मक आणि पुनर्वसनासाठी विशेष कार्यक्रमांसाठी आखणी करावी. सामाजिक लांच्छन, समाजाकडून स्वीकारार्हता आणि उपजीविकेच्या संधी यावर या कार्यक्रमांचा विशेष भर असावा.

## १७. आरोग्य आणि जीवनशैली

आरोग्य ही शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक विकासाची अवस्था असून केवळ रोग व शारीरिक अगर मानसिक दौर्बल्याचा अभाव म्हणजे आरोग्य नव्हे. उत्साह, लवचिकता, अधीरता, उतावीळपणा, अविश्रांत आणि जोखीम पत्करण्याची वर्तणूक ही युवांची वैशिष्ट्ये आहेत. या स्वभाव घटकांमुळे युवा मोठ्या प्रमाणावर रोगराईला बळी पडू शकतो आणि त्यांचे आरोग्य अस्थिर राहू शकते. त्यामुळे युवांच्या आरोग्याचा सर्वंकष विकासाची आवश्यकता असून त्यात आरोग्यसेवांची सहज उपलब्धता, समान वितरण, स्थानिक समाजाचा सहभाग, अत्यावश्यक तंत्रज्ञानाच वापर आणि युवांचे उत्तरदायित्व यांचा समावेश असला पाहिजे. युवांच्या एकूणच सामाजिक, आर्थिक विकासासाठी युवा धोरणाने आरोग्यविषयक घटकांचा अर्थपूर्ण उपयोग करणे आवश्यक आहे.

### धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

१७.१. राज्याने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. हे करीत असताना विशेषत: युवांच्या गरजा लक्षात घेतल्या पाहिजे.

१७.२. आपत्ती, साथीच्या रोगांच्या प्रादुर्भाव आणि नियमित आरोग्य सेवांसाठी स्वयंसेवकांची फळी विकसित करण्यासाठी राज्याने राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या सर्व पातळ्यांवर युवांना प्रोत्साहक सूक्ष्म, उद्‌बोधक, समन्वय कार्यकर्ता, आरोग्य संदेशवाहक, आरोग्य सेवक, समन्वयक म्हणून प्रोत्साहन द्यावे.

१७.३. आरोग्य कार्यक्रमांच्या व्यवस्थापनात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवांसाठी राज्याने पुरस्कार द्यावेत.

१७.४. आरोग्य कार्यक्रमांचे सुयोग्य नियोजन आणि अंमलबजावणीसाठी राज्याने गावपातळीवर युवांच्या जोखीम पत्करण्याच्या स्वभाव प्रारूपासह *आरोग्य जनगणना* स्वरूपात पायाभूत आरोग्य गोषवारा एकत्रित करावा व तो नियमित प्रकाशित करावा.

१७.५. युवतींचा पुनरुत्पादनाचा हक्क सुरक्षित आहे, याची राज्याने हमी द्यावी आणि पुनरुत्पादन आरोग्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार युवतींना प्रदान करावा.

१७.६. राज्याने युवांच्या विशेषत: युवती व किशोरांच्या पोषण दर्जाचा नियमित अभ्यास करावा आणि आवश्यक त्या उपाययोजना कराव्या. त्याचबरोबर सार्वजनिक वितरण प्रणाली बळकट करावी.

१७.७. राज्याने युवांच्या मानसिक आरोग्यासाठी कार्यक्रम हाती घ्यावा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर समुपदेशन केंद्रे स्थापन करावी. त्याचबरोबर अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाद्वारे अभासी समुपदेशन केंद्रे स्थापन करावी. तालुका पातळीवर व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन केंद्रे स्थापन करावी.

१७.८. युवांच्या अपघाताचे मोठे प्रमाण लक्षात घेता तालुका पातळीवर ट्रामा सेंटर व पुनर्वसन केंद्रे स्थापन करावी.

१७.९. राज्याने शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षकांना आरोग्य व रोगप्रतिबंधक उपायांचे प्रशिक्षण द्यावे. त्यात शारीरिक आणि मानसिक दौर्बल्य ओळखणे, आजारपणाची प्राथमिक लक्षणे ओळखणे, सामान्य मानसिकतेतील फरक आणि आत्महत्येच्या प्रवृत्ती ओळखणे आदी बाबींचा त्यात समावेश आहे.

१७.१०. लग्नाचे वय वाढविणाऱ्या आणि पहिली गर्भधारा उशिराने करणाऱ्यांसाठी राज्याने प्रोत्साहन आणि प्रोत्साहन भत्ता द्यावा.

१७.११. राज्याने पोषक आहाराच्या सवयीला प्रोत्साहन देण्यासाठी तयार असलेल्या खाद्यान्नावर कार्बके आणि पोषक तत्त्वे नमूद करणे बंधनकारक करावे.

१७.१२. राज्याने सर्व सार्वजनिक सुविधा ठिकाणे आणि कामांच्या ठिकाणी अपंगांना सहज संचारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

१७.१३. युवांवर विशेष लक्ष केंद्रित करून राज्याने *राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजना*ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

## १८. पर्यावरण

पर्यावरणाचा ऱ्हास ही जगभरातील युवांसमोरील मोठी समस्या आहे. विद्यमान आणि भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन आवश्यक आहे. जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी नैसर्गिक स्रोतांचा पर्यावरण मैत्रीपूर्ण वापर करण्यास प्रोत्साहन आवश्यक बनले आहे. नागरी समाज व सरकारच्या पर्यावरण मैत्रीपूर्ण धोरणाच्या आखणी आणि अंमलबजावणीत युवांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यावरच पर्यावरण संरक्षणातील युवांचा

वाढता सहभाग अवलंबून आहे. पर्यावरण संवर्धनातील समाजाच्या सहभागाचे महत्त्व लक्षात घेता राज्याने लोकजागृतीच्या व्यापक मोहिमेत युवांनी मोठ्या प्रमाणावर महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी प्रयत्न करावेत.

**धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

१८.१. राज्याने राष्ट्रीय हरित सेना कार्यक्रमाची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करावी. निधीच्या वितरणातील पारदर्शकता आणि स्थानिक परिस्थितीला योग्य रोपांची उपलब्धता करून देण्यावर भर द्यावा.

१८.२. पर्यावरण रक्षण आणि जैविक विविधता कायद्याच्या अंमलबजावणीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी गावे, शहरे, शाळा आणि महाविद्यालयात निसर्ग मंडळे स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात यावे.

१८.३. युवांना हरित जीवनशैलीचा अवलंब करण्यासाठी विविध माध्यमांतून प्रोत्साहन द्यावे. त्यासाठी शिक्षकांना पर्यावरण आणि जलवायुमान बदल रोधक व्यवस्थेचे प्रशिक्षण द्यावे.

१८.४. पर्यावरणाचे संवर्धन, जलपुनर्भरण, जलसाठ्यांचे जतन करण्यासाठी युवा गट आणि संघटना (राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना आदी) प्रोत्साहन द्यावे.

१८.५. युवांचा त्यांचे गाव, शाळा व महाविद्यालयांसारख्या शैक्षणिक संस्था, काम करीत असलेली ठिकाणे आणि शहरांच्या हरित मानक प्रकल्पात त्यांच्या पर्यावरण मैत्रीचा भाग म्हणून सहभाग वाढविण्यावर भर द्यावा.

१८.६. पर्यावरण क्षेत्रात- संशोधन, रोजगार, व्यवसायात (उदा. टाकाऊचा पुनर्वापर) रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर द्यावा.

१८.७. खाजगी क्षेत्र आणि समाजामध्ये पारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविण्यासाठी युवा गटांमार्फत प्रोत्साहन देण्यात यावे.

## १९. क्रीडा व मनोरंजन

क्रीडा आणि मनोरंजनातील सहभाग हे युवा अवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. युवांचा सर्वांगीण विकास आणि मानव संसाधन विकासासाठी हे महत्त्वाचे घटक आहेत. क्रीडा आणि मनोरंजनाची संधी उपलब्ध करून घेण्याचा आणि विश्रांती व विरंगुळा मिळविण्याचा युवांना अधिकार आहे.

**धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

१९.१. सर्व औपचारिक व अनौपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये पुरेशा प्रमाणात क्रीडा आणि मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देण्यात यावे.

१९.२. विद्यार्थी शैक्षणिक संस्थांमध्ये घालवित असलेल्या वेळातील एक पंचमांश वेळ मेदानी आणि/किंवा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रमांसाठी देण्यात आला पाहिजे.

१९.३. राज्यस्तरीय कार्यक्रमांमध्ये समुदायातील युवा गटांना क्रीडा व मनोरंजनाचे एकक म्हणून मान्यता द्यावी आणि अशा युवा गटांना पाठबळ द्यावे.

१९.४. शहरे आणि गावात युवांसाठी सामुदायिक मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात. युवतींसाठी अशा स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याचेही प्रयत्न व्हावेत. हे धोरण अशी शिफारस करते की, सर्व नागरी व महानगर पालिका क्षेत्र आणि ग्रामीण भागात दर ५००० लोकसंख्येमागे एक खेळाचे मैदान उपलब्ध करून द्यावे. तशी तरतूद नियोजन आराखड्यात करावी. स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्थानिक क्रीडा मंडळे या मैदानाचे नियोजन आणि व्यवस्थापनास जबाबदार राहतील.

१९.५. स्थानिक नाट्य मंडळे, सांस्कृतिक मंडळे, पथनाट्य मंडळे, खुले मंच यांना प्रोत्साहन देऊन मदत करण्यात यावी.

१९.६. दुर्गम भागातील क्रीडा आणि खेळांना प्रोत्साहन देऊन अतिरिक्त मदत करावी.

१९.७. क्रीडा प्रकारात युवती आणि अपंग युवांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

## २०. कला व संस्कृती

कला व संस्कृती ही समाजाच्या समृद्धीचा पाया आहे. भारतीय राज्यघटनेने निर्धारित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार कला व संस्कृतीच्या सर्व प्रकारांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यात याव्यात. हे धोरण सामाजिक न्यायाचे जतन करण्याच्या दृष्टिकोनाचे संवर्धन आणि सर्वांना समानता व प्रतिष्ठा नाकारणाऱ्या बाबी दूर सारण्यासाठी साांस्कृतिक वारसा कार्यक्रमात तन्मयतेने सहभागी होण्यास प्रोत्साहन आणि वाव देते.

### धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

२०.१ राज्याने युवा महोत्सव आणि युवा आदानप्रदान कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि भारतातील सांस्कृतिक विविधतेचा आदर करण्यास युवांना प्रोत्साहन द्यावे.

२०.२ आदिवासी आणि कृषी पर्यटनाबरोबरच सांस्कृतिक पर्यटनाला प्रोत्साहन द्यावे.

२०.३ युवा साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने साहित्य संस्कृती मंडळाने तयार केलेले सर्व कार्यक्रम आणि योजनांचा आढावा घेऊन त्यांची पुनर्रचना करावी.

२०.४ राज्याने प्रस्तावित महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरणात युवांच्या अभिव्यक्तीला वाव द्यावा आणि या प्रस्तावित धोरणात युवांच्या सहभागावर भर द्यावा.

२०.५ राज्याने कला आणि संस्कृती क्षेत्रात प्रावीण्य असलेल्या युवांसाठी रोजगाराच्या संधींची शक्यता पडताळून पहावी.

२०.६ ललित कला केंद्रांद्वारे सांस्कृतिक आदानप्रदानावर भर द्यावा. युवांसाठी तालुका पातळीवर कला दालन, खुले रंगमंच, ग्रंथालये आणि सभागृहांची निर्मिती करावी.

२०.७ युवा कलावंतांना वाव देण्यासाठी राज्यस्तरावर ललित कला आणि उपयोजित कलांसाठी राज्याने कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन करावे.

२०.८ युवांच्या मुद्द्यांना वाहिलेली नवीन दूरचित्रवाणी वाहिनी राज्याने सुरू करावी; जी युवा आणि युवा गटांना त्यांच्याशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा करण्यास, मते मांडण्यास वाव व भर देईल आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देऊन युवांमध्ये माहितीचे आदानप्रदान घडवून आणेल.

## २१. विज्ञान व तंत्रज्ञान

२१ व्या शतकात जग आणि विशेषत: महाराष्ट्र दैनंदिन जीवनाचा घटक म्हणून तंत्रज्ञान आत्मसात करण्याच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करीत आहे. मात्र बहुसंख्य युवांना तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक विकासाचे ज्ञानच नसेल तर डिजिटल दरी वाढणार आहे. युवा हे नवीन कल्पना आणि शोधाचे मुख्य वाहक आहेत, असे हे धोरण मानते. म्हणून पुढील मार्गदर्शक तत्त्वे मांडते.

### धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

२१.१. हे धोरण सरकारी क्षेत्रासह जीवनाच्या सर्व घटकांतील माहिती तंत्रज्ञानाच्या वापराचे महत्त्व ओळखून अशी शिफारस करते की, संगणक आणि प्रशिक्षणात मराठी भाषेचा समान वापर करण्यासाठी सी-डॅकने (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्सड् कॉम्प्युटिंग) विकसित केलेले युनिकोड सॉफ्टवेअरच्या वापराची सुविधा उपलब्ध करून घ्यावी.

२१.२. दैनंदिन प्रशासकीय कामकाजातील कागदाचा वापर कमी करून संगणक प्रणालीचा अवलंब करण्याचा मार्ग स्वीकारण्यासाठी राज्याने कृती गटाची स्थापना करावी.

२१.३. विज्ञान केंद्रे स्थापन करण्यासाठी स्वयंसेवी संस्था आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीला प्रोत्साहन द्यावे.

२१.४. सर्व विद्यापीठे, सरकारी/निमसरकारी संस्थांमध्ये युवांना शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार आणि सामाजिक सुरक्षेसाठी लागणारी प्रमाणपत्रे आणि औपचारिक कागदपत्रांचा राज्याने डिजिटल स्वरूपात डाटाबेस तयार करावा. युवांना तो नि:शुल्क देण्यात याव. या डेटाबेसचा सहजपणे वापर आणि अवस्थांतर करता येईल.

२१.५. डिजिटल दरी भरून काढण्यासाठी राज्याने संगणक साक्षरता, इंटरनेट सेवेची उपलब्धता यावर भर द्यावा आणि राज्यभर त्याचा प्रसार करावा.

२१.६. राज्याने संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांना मदत देऊन त्यांचे नियमन करावे आणि हे पाठ्यक्र सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून उपेक्षित युवांना उपलब्ध करून द्यावेत.

## २२. नागरिकत्व आणि सहभाग

युवा हे कोणत्याही राज्याचे महत्त्वाचे नागरिक आहेत. म्हणून त्यांनी राज्याच्या विकासात सहभागी झाले पाहिजे. युवा हे समाजाचे मौलिक सदस्य असल्याने त्यांनी केवळ निर्णयक्षमता, कौशल्य विकास आणि नेतृत्व गुण विकसित करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या कार्यक्रम आणि उपक्रमांमध्ये सहभागी होऊन चालणार नाही, तर अर्थपूर्ण सहभागाच्या संधीद्वारे त्यांनी योगदान द्यावे, यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. अंतिमत: युवांना जबाबदार पालक आणि पती/पत्नी व जबाबदार नागरिक म्हणून घडविणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

२२.१. राज्याने सर्व स्थानिक स्वराज संस्था आणि विविध सहकारी संस्थांमध्ये युवांसाठी एक तृतीयांश प्रतिनिधित्व उपलब्ध करून द्यावे.

२२.२. नागरी समुदाय, राजकीय आणि सामाजिक संस्थांचे नियमन करणाऱ्या सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व कायद्यांचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करावी आणि या संस्थांच्या प्रशासन व व्यवस्थापन रचनेत युवांच्या सक्रिय भूमिकेला वाव देणाऱ्या शक्यता पडताळून पहाव्या.

२२.३. *नागरिकत्व उपक्रमां*द्वारे युवांमध्ये स्वयंसेवी वृत्तीला चालना, लोकशाही मूल्यांचा स्वीकार करण्याची समज आणि जाणीव विकसित करावी. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरे, विशेष शिबिरे, स्वयंसेवी संस्था आणि नागरी संस्थांद्वारे आयोजित जागृती उपक्रम आदींना प्रोत्साहन व मदत द्यावी. राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या पुढाकाराशी त्याची सांगड घालावी.

२२.४. युवांचा सहभाग आणि युवा नेतृत्वाच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावर लोकशाही प्रक्रिया अमलात आणण्यासाठी प्रोत्साहन व सहकार्य द्यावे.

२२.५. तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर *युवा परिषद* स्थापन करून सरकारने या परिषदांना सहकार्य करावे. सरकारी धोरणांची आखणी आणि अंमलबजावणीत युवांचा सहभाग वाढविणे हा युवा परिषद स्थापनेमागचा हेतू आहे.

२२.६. प्रभाग आणि गाव पातळीवर हाती घेण्यात आलेल्या सार्वजनिक कामांच्याा गुणवत्ता नियंत्रणात स्थानिक रहिवाशी युवांना जाणीवपूर्वक सहभागी करून घ्यावे. खेळांची मैदाने, सार्वजनिक उद्याने, सामुदायिक जागा, टाकाऊ पदार्थांचे व्यवस्थापन व विजेच्या तारा, पाणी पुरवठ्याच्या जलवाहिन्या, मलनि:सारण व्यवस्था, नाल्यांची देखभाल आदी पायाभूत सार्वजनिक उपयोगाच्या बाबींच्या व्यवस्थापनात युवांची निश्चित स्वरूपाची सक्रिय भूमिका असली पाहिजे.

२२.७. आपत्ती व्यवस्थापनात युवांना सहभागी करून घ्यावे. त्यासाठी त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे.

२२.८. संशोधन, सामाजिक कृती कार्यक्रम आणि प्रयोगाधारित अध्ययन करणाऱ्या युवांसाठी राज्याने अभ्यासवृत्तीची (फेलोशिप) तरतूद करावी.

२२.९. राज्याने स्थानिक युवा गटांची नोंदणी आणि नियमनाची तरतूद करावी. स्थानिक स्वराज संस्थांशी त्यांना संलग्न करावे आणि या नोंदणीकृत युवा गटांसाठी मदतीची तरतूद करावी.

२२.१०. राज्याने आंतरजातीय, आंतरधर्मीय आणि आंतरपंथीय विवाहांना प्रोत्साहन देऊन त्यांना संरक्षण द्यावे.

## २३. अंमलबजावणी यंत्रणा

२३.१ युवा धोरणाच्या उद्दिष्टांची व्यापकता लक्षात घेता, ती कोणत्याही एकट्या मंत्रालय अथवा विभागाने साध्य करता येणार नाहीत. या उद्दिष्टांची व्याप्ती, संबंध सर्व मंत्रालये आणि नियोजन मंडळाशी आहे. समानता, युवांचा सक्रिय सहभाग व युवांशी मैत्रीपूर्ण सुसंगत तंत्रज्ञानाला प्रोत्साहन साध्य करण्यासाठी सर्व धोरणकेंद्रित प्रकल्पांचे एकत्रिकरण, पद्धती, अंमलबजावणी, नियमन आणि मूल्यमापन प्रभावीपणे करण्यासाठी राज्यस्तरावर एक समन्वय यंत्रणा असणे आवश्यक आहे. या यंत्रणेची कार्यकक्षा अर्थमंत्रालयापासून युवा कल्याण व क्रीडा, आरोग्य, शिक्षण, उद्योग, कृषी, समाज कल्याण, महिला व बालविकास मंत्रालयापर्यंत असेल.

२३.२ युवा विकासासाठी सामर्थ्य उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित मंत्रालयांनी क्रियाशील विचार आणि सूक्ष्म नियोजन करण्याची गरज हे धोरण प्रतिपादित करते. तसेच सर्व मंत्रालयांच्या योजना आणि उपक्रमांचे आधुनिकीकरण करण्यात यावे किंवा त्यामध्ये युवांच्या सहभागाची तरतूद करण्यात यावी, असे नमूद करते.

२३.३ युवा धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा आढावा आणि नियमन स्वायत्त राज्य युवा आयोगामार्फत घेण्यात यावा. असा आयोग स्थापन करण्याची गरज आहे. या आयोगात युवांशी संबंधित मुद्द्यांवर काम करणाऱ्या शिक्षण, प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना प्रतिनिधित्व देण्याची हे धोरण शिफारस करते.

२३.४ युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयात *क्रीडा* व *युवा कल्याण* असे दोन स्वतंत्र विभाग स्थापन करावेत. त्यांचे कामकाज स्वतंत्र असावे.

२३.५ क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्या विविध उपक्रमांमध्ये समन्वय साधण्यासाठी जिल्हा युवा केंद्र स्थापन करण्यात यावे. हे केंद्र जिल्हा स्तरावर युवा विकास उपक्रमांची सांगड घालून समन्वय साधेल. जिल्हा स्तरावरील या केंद्राचा वर्ग-१ श्रेणीतील अधिकारी प्रभारी असेल.

२३.६ गाव/प्रभाग स्तरावर युथ क्लब/युवा सहकारी संस्था, युवा गटांना प्रोत्साहन व पाठबळ द्यावे आणि त्यांना क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्या विविध उपक्रमांमध्ये समाविष्ट करून घ्यावे. हे युवा गट क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाने गाव पातळीवर हाती घेतलेल्या विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीचे काम पथदर्शी गट म्हणून पाहतील.

२३.७ राज्याने *युवा अर्थसंकल्प* जाहीर करावा. त्यामुळे प्रत्येक मंत्रालय आणि विभाग युवा विकासासाठी खर्चाची अर्थसंकल्पीय तरतूद करतील.

## २४. युवा धोरणाचे नियमन

२४.१ अर्धन्यायिक अधिकार असलेला *राज्य युवा आयोग* स्थापन करण्यात यावा. या आयोगात समाजातील विविध घटकांचा समावेश असावा. जसे- समाजाचे प्रतिनिधी, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि युवांबाबत काम करणाऱ्या व्यक्ती. या आयोगात उपेक्षित आणि वंचित घटकांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, याची दक्षता घेण्यात यावी.

२४.२ या आयोगाची भूमिका ही या युवा धोरणाचे नियमन करणे ही राहील. हा आयोग प्रामुख्याने पुढील जबाबदाऱ्या पार पाडेल :

२४.२.१ या युवा धोरणाच्या अंमलबजावणी व प्रभावाचे संनियंत्रण, आढावा व मूल्यमापन करणे.

२४.२.२ युवा धोरण व कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित मंत्रालये आणि संस्थांना मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे.

२४.२.३ युवांच्या प्रश्नांबाबत तक्रार निवारण समितीप्रमाणे काम करणे.

२४.२.४ युवा धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत सल्लगार उपसमित्या, संनियंत्रण गट व नामनिर्देशित सल्लागार यांना संयुक्त आणि सहकारी पद्धतीने सहकार्य करणे.

२४.२.५ हा आयोग युवांशी संबंधित मुद्द्यांवर संशोधनाला उत्तेजन देईल आणि त्याचे नियमितपणे अवलोकन करेल.

२४.२.६ युवा विकासाच्या हेतूने हा आयोग विविध मंत्रालयांना धोरणांच्या आखणीवेळी मार्गदर्शक तत्त्वे जारी करेल आणि युवा विकास उपक्रमांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे, याची सुनिश्चिती करेल.

## २५. संनियंत्रण आणि मूल्यमापन

२५.१ या धोरणांतर्गत घेतल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांचे संनियंत्रण व मूल्यमापन हे साध्य आधारित करावे, अशी हे धोरण शिफारस करेत. सर्व संबंधित घटकांनी दाखल केलेल्या मासिक अहवालांचे विश्लेषण करून या धोरणांतर्गतच्या उपक्रमांचे द्वैवार्षिक संनियंत्रण व मूल्यमापन करण्यात यावे. धोरणांतर्गत कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व आवश्यक सुविधांची उपलब्धता करून अपेक्षित परिणाम साधणे हा या संनियंत्रणामागचा मुख्य हेतू असावा. या संनियंत्रण प्रक्रियेत युवा आयोगाने महत्त्वाची भूमिका निभावली पाहिजे. त्यासाठी सरकारी अधिकारी आणि विविध समाज घटकांचे व युवा गटांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली सल्लागार उपसमिती स्थापन करण्यात यावी.

२५.२ युवा धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या संनियंत्रणासाठी विधानसभा व विधानपरिषदेच्या युवा सदस्यांची स्थायी समिती स्थापन करण्यात यावी.

२५.३ दर तीन वर्षांनी मूल्यमापन करण्यात यावे. धोरणाच्या प्राधान्यक्रम घटकांनुसार प्रभाव आणि उद्दिष्टांची पूर्तता यावर मूल्यमापनाचे दर्शक आधारित असावेत.

२५.४ दर तीन वर्षांनी *युवा विकास निर्देशांक* व *युवा विकास अहवाल* प्रकाशित करण्यात यावा.

**२६. आव्हाने**

या धोरणासमोर पुढील संभाव्य आव्हाने असू शकतात :

२६.१ सर्व विकासक्षेत्रांनी संकल्पनेच्या पातळीवर मुख्य प्रवाहात सहभागी करून घेतले तरच या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करता येऊ शकेल.

२६.२ व्यापक राजकीय इच्छाशक्ती आणि स्वतंत्र युवा धोरणासाठी सर्वसहमतीचा अभाव.

२६.३ या धोरणात सुचविण्यात आलेली अपेक्षित अंमलबजावणी रचना लालफितीचा बळी पडू शकते. त्यामुळे युवा धोरणाच्या अंमलबजावणीला योग्य प्राधान्य मिळण्याची कमी शक्यता.

२६.४ कोणत्याही धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीत संसाधनांची उपलब्धता महत्त्वाची असते. त्यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीत संसाधनांची उपलब्धता नसणे हा मोठा अडथळा ठरण्याची शक्यता आहे.

२६.५ युवांचा सहभाग हा त्यांच्या संदर्भानुसार विभिन्न असू शकतो.

२६.६ युवा धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सामाजिक आणि कौटुंबिक जीवनातील वयस्क व्यक्तींबरोबर काम करणे महत्त्वाचे ठरते. त्यांचे असहकार्य आणि निर्णय प्रक्रियेत युवांना वाव देण्यास विरोध यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणी प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात.

२६.७ खाजगी क्षेत्राचे वाढते प्रस्थ व युवांचा मोकळा वेळ आणि त्यांच्याशी संबंधित घटकांचे बाजारीकरण रोखणे एकट्या युवा धोरणाला शक्य नाही.

**२७. आढावा**

युवा धोरण जाहीर झाल्यापासून पाच वर्षांनी धोरणात नमूद केलेल्या विविध ध्येय घटकांच्या प्रत्यक्ष यशाचा आढावा घेण्यात यावा आणि धोरणाच्या पुढील अंमलबजावणीसाठी आवश्यक शोधन करण्यात यावे.

## २८. परिशिष्टे :

### (अ) कृती आराखडा

युवा धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे प्रत्यक्षात आणण्यासाठी हे धोरण खालील कृती आराखड्याची शिफारस करते :

२८.१. क्रीडा व युवक कल्याण खात्याचे नाव बदलून *युवा विकास खाते* असे करण्यात यावे. *युवा कल्याणा*ऐवजी *युवा सक्षमीकरणा*साठी काम करण्याचा मंत्रालयाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी ते आवश्यक आहे.

२८.२. युवा विकास आणि क्रीडा यावर स्वतंत्रपणे भर देण्यासाठी मंत्रालयामध्ये दोन स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात यावेत. (भारत सरकारने अशा दोन स्वतंत्र विभागांची निर्मिती आधीच केलेली आहे.) या दोन्ही विभागांचे प्रमुख सचिव दर्जाचे अधिकारी असावेत.

२८.३. युवा विकास मंत्रालयामार्फत घ्यावयाचे विविध पुढाकार आणि उपक्रमांची अंमलबजावणी व व्याप्ती याबाबत मार्गदर्शन व सहकार्य करण्यासाठी राज्य युवा आयोग स्थापन करण्यात यावा.

२८.४. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या धर्तीवर युवांशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये समन्वय साधण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा युवा कार्यालये स्थापन करावीत.

२८.५. क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयामार्फत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवांसाठी देण्यात येणारा *राज्य युवा पुरस्कार* पुन्हा सुरू करण्यात यावा. हा राज्य युवा पुरस्कार पारदर्शक निवड प्रक्रियेद्वारे विभागीय आणि राज्य पातळीवर प्रत्येकी एक युवक व युवतीला देण्यात यावा.

२८.६. राज्याच्या कानाकोपऱ्यातील युवांना या युवा धोरणाची व्यापक माहिती व्हावी, त्यांच्यात या धोरणाचा प्रसार व्हावा आणि त्यांनी या धोरणात सहभागी व्हावे, यासाठी राज्योन सुनिश्चित प्रयत्न करावेत. या युवा धोरणाच्या प्रति मुद्रित करून त्या सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था व राजकीय पक्षांच्या युवा आघाड्यांना वितरित करण्यात याव्यात.

२८.७. युवांसाठी आखण्यात आलेल्या सर्व योजनांच्या सुलभ अंमलबजावणीसाठी विधानसभा सदस्यांची एक समन्वय समिती स्थापन करण्यात यावी.

२८.८. राज्य आणि केंद्र सरकारने रोजगार आणि स्वयंरोजगार निर्मितीसाठी आखलेल्या सर्व योजनांचा अभ्यास करून आढावा घेण्यासाठी कृती दलाची स्थापना करण्यात यावी. या कृती दलाने या योजनांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि आवश्यकता भासल्यास नवी योजना सुरू करण्याबाबत शिफारशी कराव्यात.

२८.९. शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांमध्ये लोकशाही प्रक्रियेचे बीजारोपण करण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्था व विद्यापीठांमध्ये लिंगडोह समितीच्या शिफारशींनुसार खुल्या निवडणुका घेण्यात याव्यात.

२८.१०. जिल्हा युवा केंद्रांनी नेहरू युवा केंद्र, अन्य विभाग व स्वयंसेवी संस्थांचे सद्य:स्थितीतील उपक्रमांतील उणिवा निश्चित करून त्या दूर करण्याच्या दिशेने काम करावे. युवा गट, युवांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधित्व असलेली जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करण्यात यावी.

२८.११. या युवा धोरणाच्या अंमलबजावणीत समन्वय ठेवण्यासाठी युवा विकास विभागाने मंत्री, युवा विकास व क्रीडा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी. नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व स्काउट गाईड या संस्थांचे अधिकारी यांना या समितीवर प्रतिनिधित्व द्यावे.

२८.१२. युवांच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सर्वसमावेशक जाणीवजागृती मोहीम हाती घ्यावी.

२८.१३. व्यसनमुक्ती केंद्रे सुरू करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन द्यावे.

२८.१४. विविध मंत्रालये आणि विभागांच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती युवांना देण्यासाठी एक खिडकी माहिती व्यवस्था विकसित करावी.

२८.१५. २०० युवांना प्रशिक्षण देता येऊ शकेल, अशा क्षमतेचे राज्यस्तरीय निवासी युवा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावे. या धोरणातील मूल्यांच्या आधारे प्रशिक्षण देण्याच्या पायाभूत सुविधा या केंद्रात असाव्यात.

२८.१६. राज्याने दर तीन वर्षांनी युवा विकास अहवाल व युवा विकास निर्देशांक प्रकाशित करावा.

२८.१७. युवा विकास व क्रीडा मंत्रालयाने युवा गटांच्या मार्गदर्शनासाठी मंत्रालयाची कार्यपद्धती व वार्षिक नियोजनाबाबत विस्तृत तपशील प्रसिद्ध करावा.

२८.१८. सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी युवा वसतिगृहे स्थापन करावीत.

२८.१९. स्थानिक स्वराज संस्था स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीचा विनियोग युवा परिषद व युवा गटांच्या पूर्वसंमतीनेच झाला पाहिजे.

२८.२०. सर्व शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांनी कमवा व शिका योजना जाहीर करावी.

## परिशिष्ट (ब) :

## अंमलबजावणी



## परिशिष्ट (क) : कार्यकारी मसुदा समिती

**अध्यक्षा** - **मा. सुप्रिया सुळे**

**समन्वयक** - मा. नीलेश पुराडकर

**सदस्य** - मा. डॉ. लता नारायण, मा. मॅथ्यू मट्टम, मा. कौस्तुभ देवळे, मा. डॉ. आर. आर. शिंदे, मा. दत्ता बाळसराफ, मा. विश्वास ठाकूर, मा. नीलेश राऊत, डॉ. आनंद बंग, मा. महेंद्र रोकडे

**मसुदा समिती** - मा. नरेंद्र लांजेवार, मा. अनिता पाटील-देशमुख, मा. अतुल कहाते, मा. अनिता पगारे, मा. संजय पाटील, मा. दिलीप पांढरपट्टे, मा. ॲड. असीम सरोदे, डॉ. अमित नागरे, मा. नॅटी लोपेझ, मा. भगवान केसभट

**विशेष सहकार्य** -

| | | |
|---|---|---|
| मा. वसंतराव वैद्य | मा. सतीश जोंधळे | मा. नरेंद्र सोपल |
| मा. अभिजित पवार | मा. समीर दलवाई | मा. डॉ. आनंद करंदीकर |
| मा. विजय कान्हेकर | मा. समीरण वाळवेकर | मा. जयू भाटकर |
| प्रा. सुरेश पाटील | मा. दिनेश शिंदे | मा. डॉ. अन्वर शेख |
| मा. उमाकांत जगदाळे | मा. अभिजित राऊत | मा. अमित सामंत |
| मा. नितीन काळेल | मा. अभिजित खानविलकर | मा. शेरॉन मेनेझेस |
| मा. राजीव खांडेकर | मा. मंदार फणसे | मा. अमेय तिरोडकर |
| मा. विश्वास देवकर | मा. भाऊसाहेब पाटील | मा. अशोक सुरवसे |
| मा. पद्मभूषण देशपांडे | मा. दत्तात्रय हेलसकर | मा. सुबोध जाधव |

**सहयोगी संस्था** -

- टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस-मुंबई
- युवा-मुंबई
- कोरो-मुंबई
- सी.वाय.डी.ए.-पुणे
- पुकार- मुंबई
- नवनिर्माण-मुंबई
- विश्वास ज्ञानप्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्युट-नाशिक
- अभ्युदय फाउंडेशन-औरंगाबाद
- पीआयएमएसई-पुणे
- महात्मा गांधी सेवा संघ-परभणी
- चलो युवा कुछ कर दिखाए-यवतमाळ
- युवाहित- पुणे
- युथ टू युथ- पुणे
- सी.सी.डी.टी.- मुंबई
- प्रयास- मुंबई
- कोशिश फाउंडेशन- नागपूर
- हनुमान व्यायामशाळा- अमरावती
- मानवी हक्क अभियान- महाराष्ट्र
- सावित्रीबाई फुले महिला मंडळ- बीड
- अनुभव शिक्षा केंद्र
- कॉलेज ऑफ सोशल वर्क, निर्मला निकेतन
- बायफ- जव्हार, ठाणे
- जनमुद्रा प्रतिष्ठान- पुणे
- शांतीदूत प्रतिष्ठान- हिंगोली
- ध्येय प्रतिष्ठान- सिंधुदुर्ग

## २९. संदर्भसूची :


| | | |
|---|---|---|
| 1. | Government of India, 2007 | Maharashtra Development Report; Planning Commission, Delhi: Academic Foundation |
| 2. | Office of the Registrar General and Census Commissioner, India. | Census of India, Provisional Population Totals: Maharashtra, Series 28, Paper 1 of 2001; New Delhi: Office of the Registrar General and Census Commissioner. |
| 3. | 2001b | |
| 4. | Ministry of Youth Affairs and sports, Government of India, 1988 | National Youth Policy, 1998 |
| 5. | Ministry of Youth Affairs and Sports, Government of India | National Youth Policy, 2003 |
| 6. | 2003 | |
| 7. | Government of India, 2001 | National Policy for empowerment of women |
| 8. | Government of India, Department of Education, 1998 | National Pollicy on Education, 1968, (As modified in 1992) |
| 9. | Government of Maharashtra, 2002, | Human Development Report, Maharashtra, Planning Department, Mumbai] |
| 10. | Planning Commission, 2007 | Poverty Estimates for 2004-05; New Delhi: Government of India |
| 11. | Indian Institute of Population Studies, 2006 | Youth in India: Situation and Needs |
| 12. | UNDP, 2000 | Millennium Development Goals, U.N. website |
| 13. | United Nationa, General Assembly 1995 | World Program of Action for Youth to the year 2000 and beyond |
| 14. | United Nations Educational Scientific and Cultural Organisation | Empowering Youth Through National Policies |

| | | |
|---|---|---|
| 15. | The Presidency, Republic of South Africa, 2008 | National Youth Policy, 2008-2013 |
| 16. | Government of Pakistan, 2006 | National Youth Policy, 2006 |
| 17. | Ministery of Youth and Sports, Sierra Leonne, 2003 | National Youth Policy |
| 18. | Ministry of Labor, Government of India, 2008 | Draft National Employment Policy,2008 |
| 19. | Ministry of Labor, Government of India, 2009 | National Policy on Skill Development |
| 20. | Ministry of Labor, Government of India, 2009 | National Policy on Safty, Work and Enviornment at workplace. |
| 21. | State of Maharashtra, 1994 | Women's Policy |
| 22. | State of Maharashtra, 2001 | Employment and Self-Employment Policy |
| 23. | Ministry of Youth Affairs and Sports, Government of Maharashtra, 2006 | Interim report on sports policy of Mahrashtra |
| 24. | Jharkhand Government, 2007 | Jharkhand Youth Policy, |
| 25. | Himachal Pradesh Government, 2002 | H. P. State Youth Policy, 2002 |
| 26. | Madhya Pradesh Government, 2008 | Madhya Pradesh Youth Policy, 2008 |
| 27. | Government of Karnataka, 2008 | State Youth Policy |